**महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ,**
**'बालभारती', सेनापती बापट मार्ग, पुणे - ४११ ००४**
(दूरध्वनी क्रमांक ०२० :-२५६५९४६५ फॅक्स क्रमांक : ०२०-२५६५६०४६)

**निवेदन**
**संशोधन प्रकल्प आर्थिक साह्य योजना**

पाठ्यपुस्तक मंडळाच्या संशोधन प्रकल्प आर्थिक साह्य योजनेअंतर्गत सन २०२५-२६ या संशोधन कार्यक्रमाची निश्चिती करण्यात आलेली आहे. संशोधन प्रकल्प विषय प्रामुख्याने शालेय अभ्यासक्रम व पाठ्यपुस्तके यावर आधारित आहेत.

संशोधन प्रकल्प प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक, महाविद्यालयीन शिक्षक तसेच शिक्षक प्रशिक्षक यांना घेता येतील. वैयक्तिक स्तरावरील प्रकल्पाचा कालावधी एक वर्षाचा असेल. वैयक्तिक स्तरावरील प्रकल्पासाठी किमान रू. ५,०००/- आर्थिक साह्य देण्यात येईल. प्रकल्प समाधानकारकरीत्या पूर्ण केल्यानंतर प्रकल्पकांना व स्थानिक मार्गदर्शकांना पाठ्यपुस्तक मंडळाच्या नियमाप्रमाणे मानधन देण्यात येईल.

पाठ्यपुस्तक मंडळाने सन २०२५-२६ संशोधन कार्यक्रमाची निश्चिती केलेली आहे. पाठ्यपुस्तक मंडळाच्या संशोधन प्रकल्प आर्थिक साह्य योजनेनुसार संशोधन प्रकल्प घ्यावयाचे असतील, तर यासाठी संशोधन प्रकल्प आर्थिक साह्य योजना नियमावली व आवेदनपत्राचा नमुना www.ebalbharati.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. सदर आवेदनपत्र डाऊनलोड करून घ्यावे. डाऊनलोड केलेले आवेदनपत्र भरून या कार्यालयास पाठवण्याचा अंतिम दिनांक ३१/१०/२०२५ आहे.

क्रमांक : संशोधन/
दिनांक : १३/०८/२०२५

(अनुराधा ओक)
**संचालक**
पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे-४